चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२८ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही
# २८ लक्षचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २८/०४/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक पोलीस स्टेशन रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, नागपुर ते चंद्रपुर मार्गे बल्लारशाह कडे काही इसम चारचाकी आयशर वाहनाने दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथक विसापुर येथील टोल नाक्याजवळ सापळा रचुन थांबले असता, काही वेळातच मिळालेल्या माहितीप्रमाणे एक संशयीत आयशर वाहन येतांना दिसले. सदर वाहनास थांबवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये एक विशेष कप्पा तयार केलेला दिसुन आला. त्याकप्प्याची पाहणी केली असता, १८० पेटया देशी दारू किं. १८,००,०००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल व एक वाहन आयशर क्र. एम. एच. ४३ बी. जी. ७१०४ किं. १०,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन असा एकुण २८,०१०,०००/—रू चा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर, श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, स्थनिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि जितेंद्र वैरागडे, पोहवा. विजय संगीडवार, पोना. अविनाश दशमवार, अमजद खान, गजानन नागरे, पोशि. विनोद जाधव, मयुर येरणे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————